महाराष्ट्र शासन
(तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई अंतर्गत)
**शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव**
जलंब रोड, खामगांव , जि.बुलडाणा 444 303
फोन नं. 07253-295011 (प्रा) 295022 (का)
Web: www.gpk.edu.in E-mail : office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. शातंनिखा / अंतिम विल्हेवाट प्रक्रिया /२०२६ / 290
दि. 06 FEB 2026

## -: विद्यार्थ्यांचे जॉब्स व इतर भंगार साहीत्य विक्रीबाबत निविदा सूचना :-

१) शासकीय तंत्र निकेतन खामगाव या संस्थेतील कर्मशाळा विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेले जॉब्स व इतर भंगार इत्यादी साहीत्य हे " आहे तशा अवस्थेत, जेथे आहे तेथून " या तत्वावर " जास्तीत जास्त किंमती मध्ये " विक्री करावयाचे आहे.

२) साहीत्याचे तीन वेगवेगळे संच ( Lot १ to ०४ ) तयार केले असून इच्छूक खरेदीदार /भंगार व्यावसायिक /कंत्राटदार /टेकेदार यांचे कडून सीलबंद लिफाफ्या मध्ये निविदा ( प्रपत्र -अ ) मागविण्यात येत आहेत .

३) सदर साहीत्यांची पाहणी करीता इच्छूक खरेदीदार /भंगार व्यावसायिक /कंत्राटदार /टेकेदार यांनी दि. ०७/०२/२०२६ ते १८/०२/२०२६ पर्यंत ( शासकीय सुट्टीचे दिवस वगळता ) कार्यालयीन वेळेत प्रत्यक्षरीत्या उपस्थित राहून पाहणी करावी.

४) सदर साहीत्याच्या खरेदी करीता निविदा शुल्क रु २०० /- ( ना -परताना ) रोख रक्कम भरणे आवश्यक आहे.

५) निविदा फॉर्म ( प्रपपत्र -अ) आणि आवश्यक कागदपत्रे सीलबंद लिफाफ्यात मध्ये या कार्यालयात दि. १८/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत जमा करावी . उशिराने आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

६) भंगार साहीत्यांच्या विक्रीबाबत अटी व शर्ती आणि निविदा फॉर्म ( प्रपपत्र -अ ) सोबत जोडले आहेत .तसेच या कार्यालयाच्या संकेतस्थळावर ( www.gpk.edu.in ) प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

७) सहपत्र : निविदेबाबत च्या अटी व शर्ती ,नमुना निविदा फॉर्म ( प्रपपत्र -अ)

( डॉ.एस.ए.प्रभुणे )
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन ,खामगाव

### भंगार साहीत्यांच्या विक्रीबाबत अटी व शर्ती

१) शासकीय तंत्र निकेतन ,खामगाव या संस्थेतील कर्मशाळा विभागातील विद्यार्थ्यांने तयार केलेल्या जॉब्स व इतर भंगार साहीत्य इत्यादी साहीत्य हे " आहे तशा अवस्थेत, जेथे आहे तेथून " या तत्त्वावर " जास्तीत जास्त किमती मध्ये " विक्री करावयाचे आहे.

२) विक्री करावयाचे साहीत्यांचे तिन संच ( Lot ०१ to ०४ ) तयार केले असून इच्छूक खरेदीदार /भंगार व्यावसायिक /कंत्राटदार /ठेकेदार यांनी Lot करीता वेगवेगळे दर नमूद करणे आवश्यक आहे. परंतु Lot १ ,२,३,४ **यांची एकत्रित किमत सर्वात जास्त अधिकत्तम** नमूद करणाऱ्या खरेदीदारास भंगार साहीत्य विक्री करण्यात येईल तसेच खरेदी किमतीच्या अतिरीक्त १८ % GST चा वेगळा भरणा संबंधित खरेदीदारास करावा लागेल .

३) इच्छूक खरेदीदार /भंगार व्यावसायिक /कंत्राटदार /ठेकेदार यांनी ०७/०२/२०२६ ते १८/०२/२०२६ पर्यंत ( शासकीय सुट्टीचे दिवस वगळता ) कार्यालयीन वेळेत प्रत्यक्षरीत्या उपस्थित राहून पाहणी करुन घ्यावयाची आहे.

४) इच्छूक खरेदीदार यांना लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी त्यांचे Adhar Card , Pan Card ,GST Registration Certificate ,Shop Act License Certificate व या प्रक्रियेस आवश्यक ती इतर कागदपत्रे यांची छायांकीत प्रत निविदेसोबत जमा करणे आवश्यक आहे.

५) निविदा शुल्क २०० रु . ( ना परतावा ) जमा केल्यावरच निविदा फॉर्म (प्रपत्र -अ) संबंधित खरेदीदारास उपलब्ध करुन देण्यात येईल .

६) संबंधित खरेदीदाराने निविदा शुल्क (प्रपपत्रक -अ ) रोख रक्कम भरल्याचा पुरावा रोख पावती आणि सर्व संबंधित कागदपत्रे एकत्र करुन सिलबंद लिफाफ्या मध्ये या कार्यालयात दि. २०/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे.उशिराने आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही .

७) इच्छूक खरेदीदार यांनी निविदा फॉर्म (प्रपपत्र-अ ) मध्ये Lot ०१ to ०४ च्या साहीत्यांच्या खरेदीची किंमत ही शासकीय किंमतीपेक्षा जास्त नमुद करावी . तसेच Lot १ to ४ ची किंमत नमुद करणे अनिवार्य आहे. अन्यथा निविदा अस्विकृत करण्यात येईल.अधिकतम दर असणाऱ्या निविदेस प्राधान्य देण्यात येईल .

८) ज्या खरेदीदाराची निविदा मंजुर होईल त्या खरेदीदारास विक्री आदेश निर्गमीत करण्यात येईल.विक्री आदेश निर्गमीत झाल्यानंतर ०२ दिवसांच्या आत संबंधित खरेदीदाराने खरेदी ची रक्कम हि शासन जमा करणे बंधनकारक राहील .सदर रक्कम ही RTGS/ NEFT किंवा Demand Draft व्दारे विभागात जमा करणे बंधनकारक असेल.

९) खरेदीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर सदर साहीत्य नेण्याची परवानगी खरेदीदारास देण्यात येईल विहित कालमर्यादेत स्वखर्चाने साहीत्य घेऊन जाण्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधित खरेदीदाराची असेल.

१०) निविदेबाबत खरेदीदारांकडून कोणत्याही प्रकारची अट स्वीकारली जाणार नाही .तसेच तांत्रिक कारणास्तव साहीत्य विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय हा या कार्यालयाचा राहील.

११) कोणतेही कारण न देता निविदा मंजुर किंवा ना मंजूर करण्याचा हक्क हा या कार्यालयाचा राहील

१२) निविदे प्रक्रिये दरम्यान तारीख किंवा इतर अटींमध्ये बदल झाल्यास त्याबाबत सूचना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर आणि सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल .

१३) साहीत्य घेऊन जातांना संस्थेतील विद्यार्थी ,अधिकारी ,कर्मचारी यांना त्रास होणार नाही. याची खबरदारी संबंधित खरेदीदाराने घेणे आवश्यक आहे. तसेच संस्थेची मालमत्ता ,इमारत यांचे नुकसान होणार नाही

याकडे लक्ष देणे बंधनकारक असेल.काही नुकसान झाल्यास त्याची वसुली संबंधित खरेदीदाराकडून करण्यात येईल .

१४)संपूर्ण निविदा प्रक्रियेचे न्यायिक क्षेत्र खामगाव असेल .

निविदा भरण्याचा कालावधी

दि. ०७/०२/२०२६ पवासून दि .१८/०२/२०२६ रो संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत

( डॉ.एस.एस.प्रभुणे )
प्राचार्य ,
शासकीय तंत्रनिकेतन ,खामगाव

प्रत :- १) मा.सहसंचालक विभागीय कार्यालय तंत्रशिक्षण, अमरावती यांना माहीतीस्तव आणि संकेतस्थळा प्रसिध्द साठी

२) मा.जिल्हा माहीती अधिकारी ,बुलडाणा यांना माहीतीस्तव

३) केंद्रीय भांडार ,कर्मशाळा विभाग

४) डाटा एंट्री ऑपरेटर ,यांना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी साठी

५) रोख विभाग , शातंनिखा यांना आवश्यक कार्यवाहीकरीता

६) मुख्य सुचना फलक ,शातंनिखा